# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पोस्ट – शिर्डी – ४२३ १०९

दूरध्वनी क्रमांक (02423) 258671, 676

ई-मेल -

hospital.purchase@sai.org.in

निविदा किंमत रु.२१,०००/- अनामत रक्कम रु.२,००,०००/-

# श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी) येथे औषध दुकान चालविणेविषयी ई-निविदा

**निविदाधारकाचे नाव : -**

**पुर्ण पत्ता :-**

**दुरध्वनी क्रमांक :-**

**मोबाईल नंबर :-**

# निविदाधारकाबाबत

01) निविदाधारकाचे संपुर्ण नाव -

02) पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता -

03) दुरध्वनी क्रमांक -
ऑफीस नंबर -

मोबाईल नंबर -

04) संपर्कासाठी व्यक्तीचे नाव -

दुरध्वनी क्रमांक -

05) मालकाचे / भागीदारांचे नाव - 01)

02)

निविदाधारकाची सही व शिक्का

**मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून निविदाधारकांस पत्र**

**विषय :- श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी), शिर्डी येथे औषध दुकान चालविण्यास घेणेबाबत ..**

महोदय,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी), शिर्डी येथे औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

01) निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर अटी / शर्तीचा तपशिल सोबत दिलेला आहे.

02) अनामत रक्कम व निविदा किंमत www.mahatenders.gov.inया वेबसाईटवर भरावयाची आहे, तसेच तांत्रिक निविदेमध्ये मागणी केलेली कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावयाची आहेत.

03) प्रथम तांत्रिक निविदा उघडून त्यातील कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

04) सदर निविदा दि.१२/०२/२०२४ पासून दि.२८/०२/२०२४ पावेतो **www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील, तसेच दि. १४/०२/२०२४ रोजी साई सभागृह, शिर्डी येथे सकाळी ११ वाजता Pre – Bid Meeting होईल.

05) कोणतीही निविदा (कमी/जास्त दराची) स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे. तसेच त्याबद्दलची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे, श्री साईबाबांचे शुभाशिर्वादासह...

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीला निविदाधारकाने दयावयाचे पत्र

दि.      /      /२०२४

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**विषय :- श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी), शिर्डी येथे औषध दुकान चालविणे बाबतची ई-निविदा ..**

महोदय,

खालील सही करणार मी / आम्ही  कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला / आम्हाला मान्य आहेत. आपले अटी / शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

ई-निविदेतील नियमाप्रमाणे अनामत रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रु.दोन लाख मात्र) व निविदा किंमत रु.२१,०००/- www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर भरलेली आहे.

मी / आम्ही समजु शकतो की, कोणतीही निविदा स्विकारणे किंवा ती नामंजुर करणे ही संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

आपला / आपली विश्वासु,

सही / सहया

शिक्का

निविदाधारकाचे पुर्ण नाव व पत्ता :-

दुरध्वनी क्रमांक :-

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,

## शिर्डी - 423 109
## तालुका - राहाता, जिल्हा – अहमदनगर

## निविदेच्या अटी व शर्ती

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा हॉस्पिटलचेइमारतीमध्ये औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेसाठी ई - निविदा मागविण्यात येत आहेत. या संबंधीच्या सुचना, अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

01. ई-निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख :- दि.२८/०२/२०२४ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
02. ई-निविदाबाबतची माहिती http://www:mahatenders.gov.inया वेबसाईटवर उपलब्ध राहील.
03. निविदाधारकाने बयाना रक्कम रु.2,00,000/- (अक्षरी रु. दोन लाख मात्र) व निविदा फॉर्मची किंमत रु.21,000/- (अक्षरी रु. एकवीस हजार मात्र) रक्कम http://www:mahatenders.gov.inया वेबसाईटवर भरणे आवश्यक आहे.
04. आपण ई - निविदेमध्ये दरमहा जे भाडे देऊ केलेले आहे ते अंतिम (Final) समजले जातील. सदरचे औषध दुकान हे संस्थानतर्फे चालविण्यात येत असलेल्या धर्मदाय रुग्णालकरीता असल्याने आपणास स्वखुशीने सुट दयावयाची असल्यास तसे निविदेमध्ये नमुद करावे.
05. निविदाधारकाला परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केलेली कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावे लागतील. सर्व कागदपत्रांची पूर्तता होत नसल्यास दराबाबतची ई-निविदा उघडली जाणार नाही.
06. निविदाधारकांना वाणिज्यीक निविदा उघडते वेळी उपस्थित राहाता येईल. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकास दूरध्वनीवर कळविण्यात येईल.
07. **ज्या निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत टाकण्यात आलेले आहे, त्या निविदाधारकांनी दिलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.**
08. मंजुर झालेल्या निविदाधारकास कराराचा कालावधी कंत्राट दिल्यापासून किंवा ज्या दिवसापासून औषध दुकान प्रत्यक्षात कार्यान्वित होईल तेंव्हापासून कराराची अमंलबजावणी केली जाईल.
09. कुठलीही व्यक्ती किंवा फर्म निविदा भरण्यास पात्र राहील. परंतु औषध दुकानात काम करणारा प्रत्येक कर्मचारी डी. फार्म किंवा बी.फार्म असणे अनिवार्य राहील व निविदेसोबत त्याचे Licence देणे गरजेचे राहील.
10. औषध दुकान हे आपणास **६० महिने** कालावधीसाठी चालवयास दयावयाचे असून (कार्यादेश दिल्यापासून) त्यासाठी आपणास संस्थानकडे विहीत नमुन्यात सब रजिष्टार, राहाता यांचेकडे **Leave and Licence** Agreement स्टॅम्प पेपरवर करुन दयावा लागेल. या कराराचा कालावधी **६० महिने** धरला जाईल, व पुढील कालावधीसाठी प्रत्येक वर्षाकरीता दरमहाचे भाडे **10 टक्के** दरवर्षी वाढविण्यात येईल. दुकानासाठी सेल्फ व काऊंटर तसेच इतर सर्व साहित्य कंत्राटदाराने स्वत: ठेवावयाचे आहे. **करारासाठी व करार नुतणीकरणासाठी सब रजिष्टर, राहाता** यांचेकडे लागणारे स्टॅम्प आपणास विकत घ्यावे लागतील.
11. ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांचा करार संपुष्टात आलेनंतर पुढील कालावधीसाठी त्यांनाच दुकान चालवयास देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. करार संपुष्टात येणेपुर्वी जर दुकान चालविणेस निविदाधारकाने असमर्थता दाखवली तर आपले संस्थानखाती जमा असलेली सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येऊन भविष्यात आपणास निविदा भरण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

12. रुग्णांच्या / संस्थानच्या दृष्टीने आपणास औषध दुकान हे 24 तास औषधे विक्रीसाठी उघडे ठेवावे लागेल.
13. औषध दुकानात औषधांची विक्री करणे, नोंदी घेणे, खरेदी करणेकामी आपणास शैक्षणिक पात्रता असलेला (फार्मासिस्ट - डी.फार्म किंवा बी.फार्म) कर्मचारी ठेवणे आपणावर बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त कर्मचाऱ्याने औषधांची विक्री केल्याचे संस्थान प्रशासन अगर अन्न व औषध प्रशासन यांचे प्रतिनिधीच्या भेटीच्या वेळी निदर्शनास आलेवर होणाऱ्या कार्यवाहीची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील.
14. निविदा धारकास रुग्णालयातील डॉक्टर, रुग्णांस जी औषधे प्रिस्क्रीपशनवर लिहून देतील ती औषधे आपणास दुकानात उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहील. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रूग्णांना लागणारा औषधांचा साठा कमीत कमी १५ दिवस पुरेल इतका कायम मेडिकल स्टोअरमध्ये उपलब्ध ठेवण्यात यावा.
15. निविदाधारकाने औषधे विक्रीकामी अन्न व औषधे प्रशासन, महाराष्ट्र शासन यांनी ज्या काही विहीत अटी व शर्ती घालवून दिलेल्या आहे त्या पाळणे बंधनकारक राहील व याबाबत अन्न व औषधे प्रशासन, महाराष्ट्र शासन य्यांचेकडील विहीत अटी व शर्ती / नियम न पाळण्यास होणा-या कार्यवाही निविदाधारक जबाबदार असेल व अशा कार्यवाहीमुळे दुकान बंद झाल्यास निविदाधारकांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
16. निविदाधारकास औषधांची विक्री करणेकामी अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या नियमाप्रमाणे विक्री करावी लागेल व प्रत्येक विक्रीचे बिल ग्राहकाला देणे बंधनकारक राहील. यापेक्षा जादा दराने औषधांची विक्री केलेली आढळलेस होणाऱ्या कारवाईस आपण पात्र राहाल.
17. संस्थानचे वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांना वापरण्यासाठी काही औषधे उपलब्ध करुन देणेबाबत आपणास सांगितले तर आपणास विक्रीसाठी उपलब्ध ठेवावे लागेल. परंतु त्याचा काही कालावधीनंतर वापर झाला नाही व ती मुदतबाह्य झाली तर त्याची कोणतीही जबाबदारी संबंधीत वैद्यकीय अधिकारी अथवा संस्थानवर राहणार नाही.
18. अन्न व औषधे प्रशासन, महाराष्ट्र शासन यांच्या प्रतिनिधीने दुकानात येऊन औषधांची तपासणी केली तर त्याचे होणाऱ्या परिणामासह निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहील.
19. संस्थानमार्फत निविदाधारकास औषध दुकान चालविणेसाठी उपलब्ध ती जागा (हॉल), वीज, पाणी इत्यादी पुरविले जाईल मात्र विजेच्या वापरासाठी लागणारा आकार, दुकान चालविणेकामी अन्न व औषधे प्रशासन यांचेकडून लागणारा परवाना निविदाधारकास मिळवावा लागेल.
20. निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची कोणत्याही प्रकारची जबाबदारी (वेतन, भविष्य निर्वाहनिधी, रजा/ सुट्टया, राहणयाची, जेवणाची सोय इत्यादी) संस्थानवर राहणार नाही.
21. **ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल, त्या निविदाधारकास औषध दुकानात नामांकित कंपनीची औषधे (Branded Medicine-Tablets, Injections, Powders, Ointments, Liquids, Drops, Nebulisation Solutions any sort of medicines) विक्रीसाठी ठेवावे लागतील तसेच विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या Branded Medicine करीता 15%, Life Savings Drugs करीता 30% तर Surgical Material करीता 60% Discount दयावा लागेल.**

**तसेच संस्थानकडे दुकान चालविण्याची हमी म्हणून सहा मासिक भाडया इतकी होणारी रक्कम ही दुकान सुरु करण्यापुर्वी सुरक्षा रक्कम म्हणून भरावी लागेल. याशिवाय दरमहा ठरलेले भाडे हे प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेच्या आत संस्थानचे वित्त विभागामार्फत RTGS / NEFT द्वारे भरणे बंधनकारक राहील. वरील अनामत रक्कम करार संपल्यानंतर परत देण्याविषयी विचार होऊ शकेल.**

22. दरमहा 5 तारखेपर्यंत भाडे अदा न केल्यास वित्त विभागामार्फत प्रतिदिन रु.1000/- प्रमाणे पहिल्या 5 दिवसांसाठी आकारणी करण्यात येईल. 5 दिवसांनंतर रु.2000/- प्रतिदिन याप्रमाणे पुढील 10 दिवसांसाठी दंड आकरला जाईल व त्यानंतरही भाडे किंवा दंड अदा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कमेतून त्याची वसूली केली जाईल व करारनाम्यातील शर्तीचा भंग केल्यामुळे करार संपुष्टात आणणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.
23. संस्थानकडे ठेवणेत आलेल्या सुरक्षा / अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. औषध दुकान भाडे तत्वावर चालवितांना नैसर्गिक आपत्ती, चोरी किंवा इतर कारणांमुळे होणा-या हानीसाठी संस्थान प्रशासन जबाबदार राहणार नाही.
24. कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधी सन 1952 च्या कायद्यानुसार करावी लागणारी सर्व पुर्तता त्याविषयी कागदपत्रे अद्यावत ठेवणे याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकावर राहील.
25. निविदाधारकांने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याचे नियमानुसार संबंधीत कॉन्ट्रॅक्टर लेबर (रेग्युलेशन ॲण्ड ॲबॅलिशन) ॲक्ट 1970 नुसार हजेरी रजिष्टर, वेतन पत्रके, आयकर कपात इत्यादी अनुशंगिक कागदपत्रे विहीत नमुन्यात ठेवणे, तसेच सदरचे कायद्यानुसार त्याची पुर्तता करणे ही पुर्णपणे जबाबदारी निविदाधारकावर राहील.
26. निविदाधारकाने नियुक्त केलेले कर्मचारी कामावर असतांना त्यांनी स्वच्छ गणवेश घालणे, छायाचित्रासह ओळखपत्र लावणे आवश्यक राहील. कर्मचाऱ्यांना गणवेश, ओळखपत्र पुरविणे हे निविदाधारकाची जबाबदारी राहील.
27. संस्थानचे पुर्व परवानगी शिवाय आपणास रुग्णालय परिसरात आपली वाहने, जाहिरातीचे फलक इत्यादी लावता येणार नाही.
**28. संस्थानचे रुग्णालयासाठी वेळोवेळी लागणारे औषधे ज्या होलसेल दराने आपण खरेदी केलेली आहेत त्याच दराने जेंव्हा आवश्यक असतील तेंव्हा संस्थानला पुरवठा करावे लागतील.**
29. औषध दुकानात नामांकित कंपनीचे औषधे उपलब्ध आहेत किंवा नाही. तसेच कोणकोणती औषधे ठेवावी व त्याची खरेदी व विक्री काय दराने होते, यावर नियंत्रण ठेवणेकामी एक समिती तयार करण्यात येऊन त्यामध्ये वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, फिजीशियन, परचेस, स्टोअर मॅनेजर, वित्त व्यवस्थापक यांचा समावेश असेल. सदर समिती आवश्यकतेनुसार केंव्हाही आपले दुकानात येऊन आपलेकडे उपलब्ध असलेली औषधे उच्च प्रतीची/ नामांकित कंपनीची आहेत किंवा कसे ? याबाबत तपासणी करुन जर ती त्यांना उच्च प्रतीची / नामांकित कंपनीची आढळली नाही तर ती आपणास आपले स्वखर्चाने त्वरीत बदलावे लागतील तसेच तेथुनपुढे ती स्टोअरमध्ये ठेवता येणार नाही. अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र राज्य यांचे औषधे दुकानासंबंधी सर्व नियम व अटी आपणास बंधनकारक राहील. सदर समितीची ज्या-ज्या वेळेस मिटींग होईल त्यास आपला प्रतिनिधी हजर राहणे व त्यात केलेल्या सुचनांचे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.
**30. जर नियंत्रण समितीचे अहवालात आढळून आलेल्या उणीवांची / त्रृटी यांची पूर्तता न केल्यास प्रथम तपासणीनंतर समिती / मुख्य कार्यकारी अधिकारी / उपमुख्यकार्यकारी अधिकारी / वैद्यकिय संचालक हे केंव्हाही दुकानाची तपासणी करु शकतील व त्यात करारनाम्याप्रमाणे अटी व शर्तीची पूर्तता होत नसल्याचे आढळल्यास त्रृटींचे गांभीर्य लक्षात घेऊन रु.10000/- पर्यंत दंड करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. सदर दंडाची रक्कम आदेश पारीत झालेपासून 7 दिवसांत RTGS / NEFT द्वारे भरावी लागेल. सूचना देऊनही कामकाजात सुधारणा न झाल्यास 10 दिवसांची पूर्व सूचना देऊन करारनामा संपुष्टात आणण्यात येईल.**
**31. आपल्या औषध दुकान कधीही पूर्वसूचना न देता तपासणी करण्याचे संपूर्ण अधिकार मा. वैद्यकिय संचालक यांना राहतील. सदर तपासणी दरम्यान काही अनाधिकृत अढळल्यास त्याची पूर्ण जबाबदारी ही निविदा धारकाची राहील.**

32. करारातील कोणत्याही अटी व शर्तींचा अर्थ लावण्याबाबत विविध वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
33. निविदाधारकास प्रत्येक औषधे ही एम.आर.पी. पेक्षा जास्त किंमतीने विक्री करता येणार नाही. सर्व प्रकारचे सर्जीकल साहित्य, सलाईन, महागडी इंजेक्शन ही त्यांनी खरेदीच्या किंमतीवर किती टक्के नफा ठेऊन विक्री करावयाची याबाबत वेळोवेळी संस्थानचा निर्णय आपणास बंधनकारक राहील.
34. संस्थानचे कायम कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबितांना Angioplasty, Angiography, Bypass, Orthopedic व Neuro इत्यादी शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारी औषधे / सर्जिकल साहित्य / इम्प्लांट पुरवण्याची जबाबदारी संस्थानवर राहील.
35. रुग्णालयात होणाऱ्या ह्दयशस्त्रक्रिया, ॲन्जीओग्राफी इत्यादीसाठी लागणारी औषधे स्टेन्ट, व्हाल्व इत्यादी ही संस्थानतर्फे पुरवण्यात येतील.
36. कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दल कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
37. उपरोक्त शर्ती-अटी पैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्या निविदाधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम संस्थानखाती जमा होणेस पात्र राहील. संस्थानचे झालेली नुकसानाची नुकसान भरपाई निविदाधारकाकडून वसूली करण्यात येईल.
38. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर झालेली आहे, त्या निविदाधारकास स्वत: दुकान चालवावे लागेल, पोट भाडेकरु किंवा आपले मार्फत कंत्राटदारास चालविण्यास देता येणार नाही, असे निदर्शनास आल्यास आपला करार संपुष्टात आणण्यात येईल. आपली संस्थानखाती जमा असलेली सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल व आपले नाव काळया यादीत घेण्यात येईल.
39.श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी रूग्णास लिहून दिलेले तितकेच औषधे दयावी, अतिरिक्त औषधे दिल्याची तक्रार किंवा तशी बाब निदर्शनास आल्यास तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येईल. सलग तीन तक्रारीनंतर गंभीर स्वरूपाची कारवाई करणेत येईल.
40. दर महिन्याची खरेदी किंमत, डिस्काऊंट, एम.आर.पी. सह पुरवणे बंधनकारक राहिल. दर वर्षी GST ऑडीट रिपोर्ट घेणे बंधनकारक राहिल. भाडेतत्वावर चालविण्यात येणा-या औषध खरेदी विक्रीचे व्यवहार शिर्डीतील बॅंकेमध्ये स्वतंत्र अकाउंटवर असणे बंधनकारक आहे.
41. निविदाधारकास मागील तीन (2020-21, 2021-22, 2022-23) अर्थिक वर्षातील सरासरी उलाढाल CA यांचे स्वाक्षरीने आणि कमीत कमी रु.७ कोटी असणे अनिवार्य राहील.
42. सर्व निविदाकारांनी त्यांच्या भागीदारांची नावे, जर विशिष्ट करारामध्ये असतील तर, उघड करणे आवश्यक आहे.
    अ. सामाईक मालक/भागीदार असलेल्या किंवा एकमेकांशी आर्थिक किंवा मुख्य आणि एजंट म्हणून किंवा मालक आणि नोकर म्हणून किंवा मालक/भागीदार यांच्याशी एकमेकांशी जवळचे संबंध असलेल्या कंपन्या जसे की पती, पत्नी वडील/आई आणि मुलगा/मुलगी आणि भाऊ/ बहिणीने एकाच करारासाठी वेगवेगळ्या नावाने स्वतंत्रपणे निविदा काढू नये.
    ब. जर असे आढळून आले की कलम 43अ मध्ये वर्णन केलेल्या कंपन्यांनी एकाच करारासाठी वेगवेगळ्या नावाने स्वतंत्रपणे निविदा काढल्या आहेत, तर अशा सर्व निविदा नाकारल्या जातील आणि अशा प्रत्येक फर्म/आस्थापनेची निविदा ठेव जप्त केली जाईल. याशिवाय अशा कंपन्या/ आस्थापना काळ्या यादीत टाकण्यासह पुढील दंडात्मक कारवाईसाठी मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे अधिकारानुसार होणा-या कार्यवाहीस जबाबदार असतील.

क. जर असे आढळून आले की खंड 43अ प्रमाणे जवळच्या संबंधित व्यक्तींनी वेगवेगळ्या नावाने फर्म/ आस्थापनेसाठी स्वतंत्र निविदा/कोटेशन सादर केले आहेत परंतु अशा आस्थापने/फर्म्ससाठी आणि/किंवा अशा आस्थापना/फर्म्समध्ये त्यांचे पत्ते भिन्न असले तरी, एकाच व्यक्ती/व्यक्तींनी संयुक्तपणे किंवा वेगळ्या पद्धतीने व्यवस्थापित केलेले किंवा नियंत्रित केलेले, असे निविदाकार संबंधित फर्म/ आस्थापनांविरुद्धच्या समान कारवाईसह खंड क्रमांक 46ब प्रमाणे कारवाईसाठी जबाबदार असतील.

ड. कोणताही निविदाकार 43अ ते 43क मध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती उघड करण्यात अयशस्वी ठरतो आणि अशा प्रकारे कलमांचे उल्लंघन करत असल्यास, त्यांची अनामत रक्कम जप्त केली जाईल आणि करार केला गेला असेल आणि तो चलनात कोणत्याही वेळी रद्द केला जाईल. पुढे ते निविदाकार तसेच संबंधित फर्म/ आस्थापनांविरुद्ध काळ्या यादीत टाकण्यासह दंडात्मक कारवाईला आमंत्रित करेल.

43. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास अथवा जो वाद arbitrable ने सोडवता येत नाही, असे सर्व वाद राहाता/ कोपरगाव/ अहमदनगर याच कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

44. उपरोक्त अटी व शर्ती पैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी - शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी-शर्ती विहीत करणे याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## परिशिष्ट - “ अ ”

### अ) तांत्रिक निविदेमध्ये स्कॅन करुन अपलोड करावयाची कागदपत्रे

01) निविदाधारकाचे रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट (फार्मासिस्ट) :

02) पॅन कार्ड नंबर :

03) GST Certificate :

04) निविदाधारकाने कमीत कमी १ वर्ष मेडीकल चालविण्याच्या अनुभवाचे कागदपत्रे. :

05) निविदाधारकास मागील तीन (2020-21, 2021-22, 2022-23) अर्थिक वर्षातील सरासरी उलाढाल CA यांचे स्वाक्षरीने आणि कमीत कमी रु.७ कोटी असणे अनिवार्य राहील. (Last Three Years 2020-21, 2021-22, 2022-23 Audited Annual turnover of Tenderer, duly signed & stamped by CA (Minimum Average Annual Turnover should be Rs.7 Crore))

निविदाधारकाची सही व शिक्का

**टिप - वरील सर्व कागदपत्रे आपणास ऑनलाईन स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे.**

## अ) कमर्शियल निविदेमध्ये भरावयाची कागदपत्रे

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी) येथे औषध दुकान चालविण्यासाठी दरमहा अदा करावयाचे भाडे

| **भाडयाची प्रत्येक महिन्याची रक्कम रु.** | |
|---|---|
| **अंकी** | **अक्षरी** |
| | |

**निविदाधारकांनी वरील प्रती महिना भाडयाची रक्कम भरताना कमीत कमी रु.१७,३१,०००/- भरणे अनिवार्य आहे, त्यापेक्षा कमी दरमहा भाडयाची रक्कम भरणा-यांची निविदा ग्राहय धरली जाणार नाही.**